| MHKO070014932014 | <u>नियमित दिवाणी दावा क्र.२५५/२०१४</u><br>**सुनिल भुपाल कुरणे आणि इतर**<br>**विरुध्द**<br>**पंडीत रुकाप्पा कुरणे आणि इतर** |
|---|---|

<u>नि.क्र.४६ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे प्रतिवादी क्र.४ चे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणेविषयी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.४ हे दि.२५/०२/२०२५ रोजी व त्यापुर्वीच त्यांची मुलगी अर्चना दिलीप कांबळे या दि.०३/०५/२०२० रोजी मयत झाली आहे. त्यांना अर्जात नमुद प्रमाणे वारस आहेत. याव्यतिरिक्त अन्य कोणी सरळ वारस नाहीत. त्यांना दाव्यात पार्टी करणे न्यायाचे अंतिम हेतुस्तव गरजेचे आहे. सबब, अर्ज मंजूर करणेविषयी विनंती वादी यांनी केलेली आहे.

०३. विरुध्द बाजूने प्रतिवादीतर्फे सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देवुन योग्य तो आदेश पारित करणेत यावा असे कथन केले आहे. तसेच युक्तीवादामध्ये कॉस्ट करण्याची मागणी केली आहे.

०४. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटप आणि कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा हा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादी क्र.४ चे वारस म्हणून त्यांचे विरुध्द दावा चालविणेचा अधिकार असलेने दावेत त्यांना रेकॉर्डवर घेणे न्यायाचे हेतुस्तव आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर निकाली निघणे हे अत्यंत आवश्यक आहे. वादीतर्फे नि.क्र.४५ ला प्रतिवादी क्र.४ विरुध्द अबेटमेंट सेट असाईड आणि विलंब माफीचा एकत्रीतरित्या अर्ज केलेला आहे. तो अर्ज खर्चासह मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्जातील कथन व कारण पाहता प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र आहे. तसेच परत कॉस्ट करण्याची आवश्यकता नाही. करिता

खालील आदेश पारीत करण्यात येतो–

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.४६) हा नि.क्र.४५ वरील खर्चाची पुर्तता झाल्यास मंजुर समजण्यात यावा.

२. नि.क्र.४५ वरील आदेश हा या आदेशासोबत वाचण्यात यावा.

३. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.11.27 17:44:04 +0530

दि.२७/११/२०२५ **(अ. त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C.,<br>Jaysingpur. |
| Date of Dictation. | 27/11/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 27/11/2025. |
| Judgment/order uploaded on | 27/11/2025. |